Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भारतीय समाज व्यवस्थेमध्ये संतांचे क्रांतिकारी परिवर्तनवादी विचार

**बुरहाण सुवर्णा देविदास**
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वनी, जिल्हा यवतमाळ
suwarna77burhan@gmail.com
Mob. No-7447842923

**सारांश**

संत आणि संतसाहित्य म्हटलं की आपल्याला आठवते ती भक्ती चळवळ, देवघेव करणारे संत, देवांची भजने, कारण संतांच्या क्रांतिकारी परिवर्तन वादी विचारांना भक्तिरसात घोळून ते लोकांसमोर येऊ दिल्या गेले नाहीत. संतांचे साहित्य हे भक्तिप्रधान नसून क्रांतिकारी परिवर्तन प्रधान आहेत, ब-याच समीक्षकांनी संत साहित्याला भक्तिचे संदर्भ जोडल्यामुळे, अनेकानेक चमत्कार साहित्यामध्ये घुसडल्यामुळे लोकमानसात संभम निर्माण झालेले आहे. आणि मनाची ही संभ्रम अवस्थाच सर्वसामान्य बहुजन समाजाच्या अधोगतीचे कारण आहे.

**प्रमुख शब्द :-**

संत, संतसाहित्य, भक्ती चळवळ, क्रांतिकारी परिवर्तन, अधोगती, वारकरी संत ‘साहित्याचा आवाका फार मोठा आहे. मनाने परिवर्तनवादी विचारांच्या जवळ जाणा-या प्रत्येक माणसाला संत आणि त्यांचे साहित्य आपले, जवळचे वाटू लागले, संत साहित्याचा गाभा जाणून घेण्यात तो उत्सुक होऊ लागलेला आहे, त्याच्यामध्ये जिज्ञासा निर्माण झाली आणि आता नव्याने संतसाहित्यावर समीक्षापर पुस्तके ही लिहिल्या जाऊ लागली, वारकरी संतांचे आंदोलन हे भक्तिचे आंदोलन नसून ते मानसिक गुलामगिरीतून बहुजन समाजाला मुक्त करण्याचे आंदोलन होते, असे स्पष्ट मत मांडतांना समीक्षक दिसतात,

संत आणि संत साहित्याबद्दल सर्वसामान्य जणांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. तो निर्माण होण्याचे कारण म्हणजे बुद्धीप्रामाण्यवादी विचारधारेची धार्मिकतेच्या नावावर भक्तिच्या माध्यमातून हकालपट्टी हे होय, शास्त्र, पुराण यांच्या माध्यमातून बुद्धीप्रामाण्यजण नियतीला शरण जाऊ लागले,

दैवधिनतेचे शिकार होऊ लागले. आणि यामुळे सामान्यजणांना क्रांतिकारी परिवर्तनवादी विचार रुचले नाहीत आणि आजही रुचत नाहीत.

संतांनी आपल्या साहित्यातून जातिव्यवस्थेविरोधात बंड उभारले संत रैदास म्हणतात.

''नामदेव छीपी जाति की ओछ ।
जिनका जस गावत है लोक ।।''

अर्थात् संत नामदेव शुद्र समजल्या जाणा-या शिंपी जातीमध्ये जन्मले; पण त्यांनी परिवर्तनवादी विचारधारेची कीर्ती पताका सर्वत्र फडवविली महाराष्ट्रामध्ये संत नामदेव, संत तुकाराम यांनी तर उत्तर भारतामध्ये संत रैदास, संत कबीर यांनी समाजाला पाखंडातून, कर्मकांडातून, जातीव्यवस्थेच्या फे-यातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. संत रैदास म्हणतात,

''जात-पात के फेर मैं, उलझ रहे सब लोग ।
मनुष्यता को खा रहा है, रैदास जात का रोग।।
जात जात में जात है, ज्यों केले के पात ।
रैदास, मानुस न जुड़ सके, जब तक जात न जात ।।''

जातीव्यवस्था मानवतावाद धोक्यात आणते आणि मानवता धोक्यात आल्यामुळे बंधुभाव राहत नाही. जात हे समाज विघटनाचे हत्यार आहे. जातीने माणसे जोडण्याऐवजी तोडली जातात म्हणून संतांनी जातीव्यवस्थेचा धिक्कारच केला. संत रैदास म्हणतात.

''रैदास जन्म के कारणे, होता नहीं कोई नीच ।
नर को नीच कर डाले है, ओछे करमों की कीच ।।''

बुद्धाने धम्म आणि संघ निर्माण केला. बसवण्णाने लिंगायत आंदोलन उभारुन वचन साहित्य व अनुभव मंटप यांची निर्मिती केली संत नामदेवांनी वारकरी पंथ संघटित केला, अभंग वृत्ताची रचना केली, कीर्तन लोककलेचे प्रवर्तन केले संत रैदास, संत कबीर यांनी 'साखी' या साहित्य प्रकाराची निर्मिती केली. संत तुकारामांनी अभंग रचना केली. संत गाडगे महाराजांनी गावोगावी, खेडयापाडयात किर्तने केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजने केली. पद, पोवाडे तसेच ग्रामगीतेसारख्या साहित्याची निर्मिती केली. भगवान बाबा सानप महाराजांनी आपल्या भजन किर्तनातून संत नामदेव, संत तुकाराम यांची नव्याने ओळख करुन

दिली. संत सेवालाल यांनी बंजारा भाषेत पदे लिहिली. या सर्वांचा एक हेतू दिसतो तो म्हणजे समाजामध्ये क्रांतिकारी परिवर्तन त्यांना घडवून आणायचे होते.

आजही आम्ही देव-धर्म, जात-पात अशा मुद्यांवर पेटून उठतो. मानवता विसरून गेलेलो आहेत. आपलाच धर्म किंवा आपलीच जात कशी श्रेष्ठ यावर फुशारक्या मारण्यात धण्यता मानतो. धार्मिक स्थळांवरुन वाद करतो, एकमेकांचे जीव घेणे. अशा पार्श्वभूमीवर संत साहित्याचा अभ्यास होणे, त्यातील खरे मर्म समजून घेणे आवश्यक ठरते. आज संत साहित्याचा शोध घेऊन त्यावर योग्य पद्धतीने संशोधन होणे, त्यात चर्चा होणे, त्याची समीक्षा होणे आवश्यक आहे. आज संत साहित्याची ख-या अर्थाने गरज आहे.

**संदर्भ :-**

1. प्रा. गिते गंगाधर, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, संत रैदास कृत साहित्य विश्लेषण आणि समिक्षा.
2. प्रा. डॉ. चांदेकर चंद्रशेखर, समता प्रकाशन सामाजिक क्रांतीचे प्रणेते, संत शिरोमणी गुरु रविदास.
3. प्राचीन भारताचा इतिहास, प्रा. मा. म. देशमुख, सुधा प्रिटींग प्रेस, (तृतीय आवृत्ती, 1974).